**"बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील) व डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनांचा लाभ घ्यावा"**

आदिवासी शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ करुन त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील) सन २०१९-२० मध्ये ठाणे जिल्हयात राबविण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनांतर्गत अनुसूचित जाती/ नवबौध्द शेतकरी यांचे जीवनमान उंचावण्यासाठी सन २०१९-२० मध्ये ठाणे जिल्हयात राबविण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर योजनांर्गत खालील बाबी अंतर्भूत असून त्यांची उच्चतम अनुदान मर्यादा खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा (रुपये ) |
|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २,५०,०००/- |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,०००/- |
| ३ | ईनवेल बोअरिंग | २०,०००/- |
| ४ | वीज जोडणी आकार | १०,०००/- |
| ५ | शेततळयाचे प्लॅस्टिक अस्तरीकरण | १,००,०००/- |
| ६ | सूक्ष्म सिंचन संच अ) ठिबक संच | ५०,०००/- |
| | ब) तुषार संच | २५,०००/- |
| ७ | परसबाग | ५००/- |
| ८ | पंपसंच (डिझेल/विदयुत) | २००००/- (१० अश्वशक्ती पर्यंत) |
| ९ | पीव्हीसी /एचडीपीई पाईप | ३००००/- |

**(वरील अ.क्र. ७ व ९ मधील नमूद बाबी या फक्त बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना क्षेत्रांतर्गत / क्षेत्रा बाहेरील) अनूसूचित जमाती प्रवर्गासाठी लागू राहतील.)**

सदर योजनांतर्गत वरील बाबींचा समावेश असला तरी या योजनेचा लाभ पॅकेज स्वरुपात देय आहे असे एकूण तीन पॅकेज असून पैकी एका पॅकेजचा लाभ देय राहील.

- **नवीन विहीर पॅकेज** – सदर पॅकेज अंतर्गत लाभ घेणा-या शेतक-यांना नवीन विहीर वीज जोडणी आकार सुक्ष्म सिंचन संच (ठिबक/तुषार), पंपसंच, पीव्हीसी /एचडीपीई पाईप, परसबाग या बाबींचा लाभ देय आहे. तथापी यापूर्वी कोणत्याही शासकिय योजनेतून लाभार्थ्याने नवीन विहीर या बाबीचा लाभ घेतलेला नसावा.
- **जुनी विहीर दुरुस्ती** – सदर पॅकेज अंतर्गत लाभ घेणा-या शेतक-यांना जुनी विहीर दुरुस्ती, वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच (ठिबक/तुषार), पंपसंच, पीव्हीसी/ एचडीपीई पाईप, परसबाग या बाबींचा लाभ देय आहे. तथापी यापूर्वी कोणत्याही शासकीय योजनेतून लाभार्थीन विहीर घटकाचा लाभ घेतलेला नसावा.
- **शेततळयाचे अस्तरीकरण** - सदर पॅकेज अंतर्गत लाभ घेणा-या शेतक-यांना शेततळयाचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच (ठिबक/तुषार), पंपसंच, पीव्हीसी /एचडीपीई पाईप, परसबाग, या बाबींचा लाभ देय आहे. तथापी यापूर्वी कोणत्याही शासकिय योजनेतून अशा लाभार्थीने नवीन विहीर , जुनी विहीर दुरुस्ती अशा घटकाचा लाभ घेतलेला नसावा.

- ज्या शेतक-यांनी यापूर्वीच शासकिय योजनेतून विहीर घेतली असेल अथवा स्वखर्चाने विहीर बांधली असेल अशा शेतक-यांना वीज जोडणी आकार, सुक्ष्म सिंचन संच (ठिबक/तुषार) पंपसंच, पीव्हीसी पाईप/एचडीपीई पाईप, परसबाग यासाठी अनुदान देय राहील.
- **सोलर पंपासाठी अनुदान** - जर शेतक-यास महावितरण कंपनीकडून सोलरपंप मंजूर झाला असेल तर पंपसंच व वीजजोडणीसाठी अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेत (रु.३०,०००/-) लाभार्थी हिश्श्याची रक्कम महावितरण कंपनीस अदा करता येईल.

**लाभार्थी पात्रतेचे निकष**

- बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेकरीता लाभार्थीकडे अनुसूचित जमाती प्रवर्गातील सक्षम प्राधिका-यांने दिलेले जात प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेकरीता लाभार्थीकडे अनुसूचित जाती / नवबौध्द प्रवर्गातील सक्षम प्राधिका-यांने दिलेले जात प्रमाणपत्र असणे बंधनकारक आहे.
- नवीन विहीर या बाबीचा लाभ घ्यावयाचा असल्यास लाभार्थी कडे किमान ०.४० हेक्टर जमीन क्षेत्र असणे आवश्यक. इतर बाबींचा लाभ घेणा-या शेतक-याकडे किमान ०.२० हेक्टर क्षेत्र असणे आवश्यक.
- या योजनांतर्गत लाभ घेण्यासाठी सर्व बाबींसाठी कमाल क्षेत्र मर्यादा ६.०० हेक्टर आहे.
- शेतक-याच्या नांवे जमीनधारणेचा ७/१२ दाखला व ८अ उतारा असणे आवश्यक आहे. (नगर पंचायत , नगरपालिका, महानगर पालिका क्षेत्रातील लाभार्थी वगळून)
- लाभार्थी कडे स्वत:चे आधारकार्ड असणे आवश्यक आहे.
- लाभार्थीचे स्वत:चे बॅक खाते त्याच्या आधारकार्डाशी संलग्न असणेआवश्यक आहे.
- बिरसा मुंडा कृषि क्रांती योजनेअंतर्गत परंपरागत वन निवासी (वन अधिकार मान्यता ) अधिनियम २००६ नुसार वनपट्टेधारक शेतक-यांना प्राधान्य आहे.
- लाभार्थीचे सर्व मार्गाने मिळणारे वार्षीक उत्पन्न रु १,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे तसा तहसिलदार यांचेकडून सन २०१८-१९ चे उत्पन्नाचा दाखला असणे आवश्यक .

सदर योजनांतर्गत ऑनलाईन अर्ज सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून दिनांक ५.८.२०१९ ते दिनांक ४.९.२०१९ या कालावधीत आवश्यक कागदपत्रासह आपला ऑनलाईन अर्ज **www.agriwell.mahaonline.gov.in** या संकेत स्थळावर दाखल करावा. तसेच आवश्यक सर्व मूळ कागदपत्रासह आपला अर्ज आपणाशी संबधीत पंचायत समिती कार्यालयामधील कृषि अधिकारी यांचेकडे वेळेत स्वहस्ते सादर करावा व अर्जाची पोहोच घ्यावी.

ठाणे जिल्हयातील जास्तीत जास्त शेतक-यांनी बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना (क्षेत्रांतर्गत/क्षेत्राबाहेरील ) तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन या योजनांचा लाभ घ्यावा व अधिकचे माहितीसाठी आपले संबधीत पंचायत समिती मधील कृषि अधिकारी यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन श्री. ब. भि.नेमाने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद ठाणे आणि श्री. किशोर जाधव , सभापती कृषि व पशुसंवर्धन समिती जिल्हा परिषद ठाणे यांनी केले आहे.

कृषि विकास अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे